# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 21 March 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – २१ मार्च २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- चालू वर्षात देशाची क्षयमुक्तीकडे वेगाने वाटचाल–क्षयरुग्णाच्या प्रमाणात लक्षणीय घट
- राज्याचा आगामी आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प विधानसभेत मंजूर
- घाटी रुग्णालयात नवीन शस्त्रक्रिया इमारतीसाठी ७१० कोटी–आठवडाभरात प्रशासकीय मान्यतेची ग्वाही
- ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांच्यावर लैंगिक शोषणाचा आरोप केलेल्या महिलेस खंडणीप्रकरणी अटक

आणि

- देवगड हापूस आंब्यावर यूआयडी सील–फसवणूक रोखण्यासाठी संघटनेचा निर्णय

****

चालू वर्षात देशाची क्षयमुक्तीकडे वेगाने वाटचाल होत असल्याचं, केंद्र सरकारने सांगितलं आहे. आज लोकसभेत केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी प्रश्नोत्तराच्या तासांत ही माहिती दिली. २०१५ मध्ये क्षयरुग्णाचं प्रमाण प्रति लाख २३७ रुग्णांच्या तुलनेत २०२३ मध्ये हे प्रमाण प्रति लाख १९५ रुग्ण झालं असून, क्षयरोगामुळे होणाऱ्या मृत्यूच्या प्रमाणातही २१ टक्क्यांहून अधिक घट झाल्याचं पटेल यांनी सांगितलं. क्षयरोगाच्या उपचाराच्या प्रमाणातही ३२ टक्के वाढ झाली असून, देशात ३४७ प्राधान्य जिल्ह्यांमध्ये १०० दिवसांचं क्षय निर्मुलन अभियान राबवलं जात असल्याची माहिती पटेल यांनी दिली.

****

राज्याचा आगामी आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प आज विधानसभेत मंजूर झाला. अर्थसंकल्पातील अनुदानाच्या विभागवार मागण्यांवर सभागृहात चर्चा झाली आणि त्या मंजूर झाल्या. त्यानंतर आज अर्थमंत्री अजित पवार यांनी महाराष्ट्र विनियोजन विधेयक मंजुरीसाठी सादर केलं आणि ते सभागृहाने एकमताने मंजूर केले

****

दाओसमध्ये यंदा झालेल्या करारांमुळे राज्यात १६ लाख रोजगार निर्मिती होणार असून, या करारांची चोख अंमलबजावणी राज्य सरकार करेल, अशी ग्वाही उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज विधानपरिषदेत दिली. सत्ताधारी आणि विरोधकांनी नियम २६० अन्वये मांडलेल्या दोन स्वतंत्र प्रस्तावांवरील चर्चेला ते उत्तर देत होते. दावोस करारांसंदर्भात विरोधकांनी केलेले आरोप फेटाळून लावत, पुढच्या अधिवेशनात दाओसमध्ये महायुती सरकारने गेल्या तीन वर्षांत केलेल्या कराराच्या अंमलबजावणीची माहिती दिली जाईल, असं सामंत यांनी सांगितलं.

****

छत्रपती संभाजीनगर इथं शासकीय वैद्यकीय महाविद्यालय घाटी रुग्णालयात नवीन शस्त्रक्रिया इमारत उभारणीसाठी ७१० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. येत्या आठ दिवसात याला प्रशासकीय मान्यता दिली जाईल अशी माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी आज विधान परिषदेत दिली. आमदार सतीश चव्हाण यांनी विचारलेल्या तारांकित प्रश्नाच्या उत्तरात ते बोलत होते. दोन महिन्याच्या आत सदरील इमारत उभारणीचे काम सुरू करण्याचा प्रयत्न असल्याचं, मुश्रीफ यांनी सभागृहात सांगितलं. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विक्रम काळे, संजय केणेकर आदी सदस्यांनी या चर्चेत सहभाग घेतला.

****

विधान परिषदेच्या पाच जागांवर बिनविरोध निवडून आलेल्या सदस्यांची नावं आज राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली. आज विधान परिषदेत ही माहिती देण्यात आली. छत्रपती संभाजीनगर इथले भाजप नेते संजय केणेकर यांच्यासह पाच नवनिर्वाचित सदस्यांना सभापती राम शिंदे यांनी सदस्यत्वाची शपथ दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवीन सदस्यांचा परिचय सभागृहाला करून दिला.

**बाईट – संजय केणेकर**

****

छत्रपती संभाजीनगर, धाराशिव आणि अहिल्यानगर जिल्ह्याचं नामांतर होऊनही प्रशासकीय कामकाजात अनेकदा जुन्या नावांचा उल्लेख येत असल्याचं निरीक्षण विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी नोंदवलं. याची योग्य दखल घेण्याची सूचना शिंदे यांनी केली.

****

जल प्रदुषण कायद्यात सुधारणेचं विधेयक आज विधान परिषदेत संमत करण्यात आलं. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी हे विधेयक सदनासमोर सादर केलं. महाराष्ट्र मोटार वाहन कर सुधारणा विधेयकावर आज विधान परिषदेत चर्चा झाली. मोटर वाहन कायद्यात सुसूत्रता आणणं, वाहनांच्या किंमतीवर आधारित कर आकारणी करणं, तसंच मोटर वाहन कराचे दर वाहनांच्या सध्याच्या बाजारमूल्याशी सुसंगत ठेवण्यासाठी कराच्या कमाल मर्यादेत वाढ करण्याची तरतूद या विधेयकात आहे, असं सरनाईक यांनी सांगितलं.

****

हिंगोली जिल्ह्यात हर घर नल योजना डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्यात येईल, तसंच नांदुरा इथल्या हर घर नल योजनेचं काम वेळेत पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदारावर एक लाख रुपये दंड ठोठावण्यात आला आहे. मेघना बोर्डीकर साकोरे यांनी विधान परिषदेत ही माहिती दिली. प्रज्ञा सातव, हेमंत पाटील, सदाभाऊ खोत यांनी याबाबत प्रश्न विचारला होता. जिल्ह्यात १८० योजना पूर्ण झाल्या असून, १९० योजनांचं ७५ टक्क्यांपेक्षा अधिक, तर १३१ योजनांचं ५० टक्क्यांपेक्षा अधिक काम झालं असून, उर्वरित कामं प्रगतीपथावर आहे. दिरंगाई करणाऱ्या ३३७ कंत्राटदारांना नोटीसा बजावून ९१ लाख रुपये दंड ठोठावण्यात आल्याची माहिती राज्यमंत्र्यांनी दिली. कुचराई करणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कारवाईचे संकेत बोर्डीकर यांनी दिले.

****

लातूर शहरात पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी ठोस नियोजन करण्याची सूचना विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिली आहे. विधान भवनात घेतलेल्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. लातूर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे, यांच्यासह जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, आणि इतर अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे या बैठकीत सहभागी झाले.

****

खासगी तसंच देवस्थानच्या जमिनी वक्फ बोर्डाने बळकावल्या असल्याचं आढळल्यास त्या काढून घेतल्या जातील, असं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं आहे. राज्यात अनेक ठिकाणी वक्फ बोर्डाने जमिनी बळकावल्याच्या तक्रारी केल्या जात आहेत, याबाबत केंद्रीय स्तरावर कायदा करण्याचं काम सुरु आहे, अशी माहिती बावनकुळे यांनी दिली.

****

महात्मा बसवेश्वर यांच्या सोलापूर इथल्या प्रलंबित स्मारकासाठी एक महिन्याच्या आत नवीन समितीची निवड करण्याचं तसंच जागा निश्चितीबाबत तोडगा काढण्याचं आश्वासन सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिलं आहे. विधानसभेत सदस्य अभिजीत पाटील, समाधान औताडे यांनी विचारलेल्या प्रश्नावर गोरे बोलत होते.

****

ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांच्यावर लैंगिक शोषणाचा आरोप केलेल्या महिलेस सातारा पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या पथकाने आज खंडणीप्रकरणी अटक केली. संबंधित महिलेने मंत्री गोरे यांच्या विरोधात अत्याचाराचा गुन्हा नोंदवण्याची धमकी देत तीन कोटी रुपयांची मागणी केली होती. यासंदर्भातलं संभाषण पोलिसांच्या हाती लागल्यानंतर पोलिसांनी आज सापळा रचत ही कारवाई केली. आपल्या वकिलाच्या कार्यालयात एक कोटी रुपयांची रक्कम घेतांना या महिलेला रंगेहात अटक करण्यात आली, असं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

नागपूर शहरात दोन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील संचारबंदी हटवण्यात आली असून, सहा पोलीस ठाण्याच्या हद्दीतल्या संचादबंदीत दुपारी दोन तास शिथीलता देण्यात आली आहे. नागपूरचे पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र सिंघल यांनी ही माहिती दिली. या हिंसाचार प्रकरणी ९९ जणांना अटक करण्यात आली आहे

****

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेनी यावर्षीपासून प्रत्येक देवगड हापूस आंब्यावर टॅम्परप्रूफ यूआयडी सील सक्तीचं करण्याचा निर्णय घेतला आहे. आतापर्यंत असे एक कोटी स्टिकर्स तयार करण्यात आले असून देवगडमधल्या ३०८ शेतकऱ्यांनी ५० लाखाहून अधिक स्टिकर्स घेतले आहेत. ग्राहकांची फसवणूक आणि खऱ्या उत्पादकांचं नुकसान टाळण्यासाठी घेतलेल्या या निर्णयाबाबत आमच्या प्रतिनिधींनी अधिक माहिती दिली.

**बाईट – निलेश जोशी**

****

मुंबई विद्यापीठात रोबोटिक्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता केंद्र स्थापन केलं जाणार आहे. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.रवींद्र कुलकर्णी यांनी ही माहिती दिली. मुंबई विद्यापीठ आणि जॅन्युटेक इंडस्ट्री यांच्यात या संदर्भात एक सामंजस्य करार झाला आहे. या कराराच्या अनुषंगानं रोबोटिक्स सिस्टम, ऑटोमेशन, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारीत एप्लीकेशन्सवर विद्यार्थी आणि संशोधकांना प्रत्यक्ष प्रशिक्षण आणि प्रकल्पांवर काम करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

****

हिंगोली जिल्ह्यात वाळूने भरलेल्या भरधाव टिप्परने दुचाकीला धक्का दिल्याने एकाचा जागीच मृत्यू झाला. सेनगाव तालुक्यातील आजेगाव इथं हा अपघात झाला, गणेश उत्तम तनपुरे असं या युवकाचं नाव असून, त्याचा येत्या सोमवारी २४ मार्च रोजी विवाह होणार होता.

****

नांदेड महापालिकेचा आगामी आर्थिक वर्षाचा एक हजार ५२३ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प प्रशासक तथा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी मंजूर केला. ५ कोटी ८५ लाख रुपये शिलकीच्या या अर्थसंकल्पात कोणतीही करवाढ सुचवण्यात आलेली नाही

****

महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलातल्या शासकीय ग्राहकांना वीजबिल भरण्यासाठी २४ मार्चपर्यंत मुदत देण्यात आली आहे. परिमंडलांतर्गत विविध शासकीय कार्यालयं, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या पाच हजार २२२ ग्राहकांकडे ११६ कोटी २५ लाख रुपयांची थकबाकी आहे.

****